**"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास" योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.**

सन २०२३-२४ करीता (लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) अंतर्गत
ठाणे महानगरपालिका, जि. ठाणे करीता
रक्कम रु. ५.०० कोटी

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२३/प्र.क्र.४३४/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- १५ जून, २०२३.**

**संदर्भ:-**

(१) शासन निर्णय, क्र. शासन निर्णय क्रमांक-धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६ दिनांक १२ डिसेंबर, २०१७, दिनांक ३० सप्टेंबर, २०२० व दि. २४ एप्रिल, २०२३

(२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दिनांक १२ एप्रिल, २०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिकांना मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भांधीन क्रमांक (२) अन्वये ठाणे महानगरपालिकेस २०२३-२४ वर्षासाठी अर्थसंकल्पीत निधीतून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास"** योजनेअंतर्गत **ठाणे महानगरपालिका, जि. ठाणे करीता रक्कम रु.५,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच कोटी फक्त)** इतका निधी सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील कामांसाठी वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

**२.** सदर प्रकल्पा अंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा **"महानगरपालिका"** राहील.

**३.** "सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहील. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यान्वयन यंत्रणेच्या) तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी."

४. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

५. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

६. तांत्रिक मान्यता दिलेली कमी किमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) एकत्रित करून शासनाकडून एकत्रित प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात आलेली आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई- निविदा पद्धतीनेच करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

७. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित

करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व: उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

८. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

९. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन,संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

१०. सदर निधी दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करिता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

११. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, ठाणे यांना नियंत्रक अधिकारी, तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे यांना आहरण व संवितरण

अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, ठाणे / जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१२. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

१३. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१४. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

१५. या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबित असल्यास निधी आहरीत करू नये.असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

१६. आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदर निधी अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१७. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा. सदरचा निधी जिल्हाधिकारी यांनी थेट वळता करू नये.

१८. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-११९८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१व दि.२८ मार्च,२०२२ अन्वये कार्यवाही करावी.

१९. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास,८०, सर्वसाधारण,१९१, महानगरपालिकांना सहाय्य,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,(००) (०९) महागनरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद, (२२१७ ०९१३), ३१, सहाय्यक अनुदान, या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२०. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२ एप्रिल, २०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्रीकांत आंडगे)
**उपसचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त, कोकण
३. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, जि. ठाणे.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन, सातवा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
५. जिल्हाधिकारी, ठाणे
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११. सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई - ४०० ६१४
१२. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१४. जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे

१५. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई

१६. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**शासन निर्णय क्रमांक: मनपा-२०२३/प्र.क्र. ४३४/नवि-१६,**

**दिनांक १५ जून, २०२३ सोबतचे विवरणपत्र**

**ठाणे महानगरपालिका, जि. ठाणे क्षेत्रातील कामे**

| अ.क्र. | कामांची नावे | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| १ | शासकीय तांत्रिक शाळा कोपरी ठाणे पूर्व येथील नियोजीत स्वर्गीय वसंतराव डावखरे स्मृती उद्यान विकास करणे अर्थात उद्यान आवार भिंत व प्रवेशद्वार उभारणे. | १७.०० |
| २ | शासकीय तांत्रिक शाळा कोपरी ठाणे पूर्व येथील नियोजीत स्वर्गीय वसंतराव डावखरे स्मुती उद्यान अंतर्गत जागा विकसित करणे व उद्यानाच्या परिघामध्ये कॉक्रीट लादीकरण करुन जॉगिंग ट्रॅक तयार करणे. | |
| ३ | शासकीय तांत्रिक शाळा कोपरी ठाणे पूर्व येथील नियोजीत स्वर्गीय वसंतराव डावखरे स्मुती उद्यान अंतर्गत उद्यानामध्ये बसण्यासाठी आसन व्यवस्था करणे व अनुषंगीक कामे करणे. | १८.०० |
| ४ | ठाणे महानगरपालिका अंर्तगत मनोरमानगर येथील न्यु रचना पार्क को-ऑपरेटीव्ह हैसींग सोसायटी परिसरात ओपन जिम साहित्य बसविणे. | |
| ५ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत माजिवडा मानपाडा प्रभाग समिती येथे पातलीपाडा, वाघबीळ, विजय नगरी परिसरात आसन व्यवस्था करणे. | १५.०० |
| ६ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत माजिवडा मानपाडा प्रभाग समिती येथे भूमी एकर चौक परिसरात शेड बनविणे. | १५.०० |
| ७ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत वागले प्रभाग समिती येथे किसन नगर - ३ रोड नं. २२ परिसरात जेष्ठ नागरिक कट्टा तयार करणे. | १५.०० |
| ८ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत वर्तकनगर प्रभाग समिती येथे शास्त्रीनगर नाका परिसरात शेड बनविणे. | २०.०० |
| ९ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत दिवा प्रभाग समिती येथे खर्डीगाव स्मशानभूमीचे नूतनीकरण करणे. | १५.०० |
| १० | ठाणे महानगरपालिका अंतर्गत दिवा प्रभाग समिती येथे प्रभाग क्रमांक २९ मध्ये आसन व्यवस्था करणे व डस्टबीन पुरविणे. | २०.०० |
| ११ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत माजिवडा मानपाडा प्रभाग समिती येथे कासारवडवली, ओवळा, गायमुख, मोघरपाडा परिसरात आसन व्यवस्था करणे व डस्टबीन पुरविणे. | २०.०० |
| १२ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत वर्तकनगर प्रभाग समिती येथे भिम नगर परिसरात आसन व्यवस्था करणे. | १०.०० |
| १३ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत वर्तकनगर परिसरात ठाणे महानगरपालिका शाळा क्र. १५ येथे संगणक पुरविणे. | १०.०० |

| अ.क्र. | कामांची नावे | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| १४ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत लोकमान्य प्रभाग समिती अंतर्गत साठे नगर परिसरात ई- टॉयलेट बसविणे, | १५.०० |
| १५ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत वागले प्रभाग समिती अंतर्गत किसन नगर १, पडवळ नगर, शिवाजी नगर, जय महाराष्ट्र नगर परिसरात दिशादर्शक बसविणे. | १०.०० |
| १६ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत नौपाडा- कोपरी प्रभाग समिती येथे डॉ. भिमराव आंबेडकर हौ. सो. परिसरात कॉक्रीटीकरण करणे. | २५.०० |
| १७ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत नौपाडा कोपरी येथील महाराणी अहिल्यादेवी होळकर पुतळा परिसरात पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विविध स्थापत्य कामे करणे. | २५.०० |
| १८ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत प्र. क्र. १ मधील वळवीपाडा समोरील सर्विस रोड लगत फुटपाथचे नूतनीकरण करणे. | २५.०० |
| १९ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत प्र. क्र. १ मधील आनंदनगर येथील फुटपाथचे नूतनीकरण करणे. | २५.०० |
| २० | ठाणे महानगरपालिका अंतर्गत प्र. क्र. १५ मधील संत ज्ञानेश्वर नगर नाका व पोलीस चौकी लगत च्या परिसरात शेड व आसन व्यवस्था करणे. | २५.०० |
| २१ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत प्र. क्र. १ मधील कासारवडवली येथे शांताराम शिंदे उद्यानाचे सुशोभीकरण करणे. | २५.०० |
| २२ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत प्र. क्र. १ व २ मधील परिसरात विविध ठिकाणी आसन व्यवस्था करणे. | २५.०० |
| २३ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत प्र. क्र. २ मधील पातलीपाडा येथे कमिशनर बंगला बाजूस उद्यानाचे सुशोभीकरण करणे. | २५.०० |
| २४ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत दिवा प्रभाग समिती येथे बेडेकर नगर, मनोहर पाटील चाळ परिसरात गटार बनविणे. | १०.०० |
| २५ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत वागळे प्रभाग समिती येथे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज परिसरात निवारा शेड बनविणे. | २५.०० |
| २६ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत कोपरी प्रभाग समिती येथे शंकर मंदिर परिसरात गटार व पायवाट करणे. | २५.०० |
| २७ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत दिवा प्रभाग समिती येथे बेडेकर नगर परिसरात शिवसाई कृपा चाळ लगत परिसरात गटार बनविणे. | २५.०० |
| २८ | ठाणे महानगरपालिका अंतर्गत दिवा प्रभाग समिती येथे बेडेकर नगर परिसरात जय भोले चाळ लगत गटार बनविणे. | १५.०० |
| | **एकूण रक्कम रु. (लक्ष)** | **५००.००** |